# भारतातील महिला सबलीकरण : एक दृष्टीक्षेप

**प्रा. डॉ. आनेराव एम. एम.**
*समाजशास्त्र विभागप्रमुख*
*लोकमान्य महाविद्यालय, सोनखेड*
*ता. लोहा जि. नांदेड*

ए **प्रस्तावना**

महिला सबलीकरण ही वर्तमानकाळातील महत्वाची संकल्पना आहे. संपूर्ण जगामध्ये महिला सबलीकरणाचा स्वीकार केलेला आहे. जगातील बहुतांश देशामध्ये स्त्रीयांचा दर्जा दुय्यम मानला गेला आहे. त्यामुळे महिलांच्या आरोग्याचा, शिक्षणाचा, शोषणाचा, हिंसाचाराचा आदी अनेक समस्या निर्माण होण्यास कारणीभूत ठरल्या आहेत. त्यामुळे महिलांचे प्रश्न अधिकच गंभीर बनले गेले. कोणत्याही देशांच्या अर्ध्या हिस्यांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या स्त्रिंया यांना विकासापासून दुर ठेवणे प्रगतीचे लक्षण मानले गेले नाही. त्यामुळे विकास कार्यक्रमातील त्यांची भागीदारी महत्वाची आणि अपरिहार्य ठरली. आर्थिक, सामाजिकए राजकीयए सांस्कृतिक, धार्मिक आदी क्षेत्रात स्त्रीयांनी विधायक आणि सक्रीय भूमिका बजावल्याशिवाय सर्व समावेशक असा समाजाचा विकास होणार नाही हे लक्षात घेवूनच महिला सबलीकरणचे महत्व जगाला पटले.

भारतीय समाजातील स्त्रीयांचा विचार केला तर भारतीय समाजव्यवस्थेत स्त्री-पुरुषांना मिळणा-या ज्या अधिकारात आणि दर्जात कमालीचा अंतर दिसून येतो. प्राचीन काळापासून भारतीय संस्कृतीत स्त्रीयांना दुय्यम स्थन दिले गेले आहेत. चूल आणि मूल हेच तिचे कार्यक्षेत्र मर्यादीत ठेवले गेले. भारतीय समाजातील अन्यायकारक वागणूकीमूळे स्त्रियांच्या अनेक सामाजिक समस्या गंभीर बनल्या. स्त्रियांना अनेक मूलभूत हक्कांपासून वंचित ठेवण्यात आले. भारतीय समाजातील एक वंचित आणि दूर्बल घटक म्हणून स्त्रियांकडे पाहिले जावू लागले. परंतू आधुनिक काळात स्त्रियांना सामाजिक विकासापासून वंचित ठेवणे कोणत्याही समाजाच्या शाश्वत विकासासाठी हानिकारक आहे. हे सर्व लक्षात घेवूनच भारत सरकारए राज्य सरकार आणि अनेक सेवाभावी संस्था यांनी महिला सशक्तीकरणासाठी अनेक उपक्रम राबवून त्यांना विकासाच्या प्रक्रीयेत सामावून घेण्यात आले. भारतीय राज्यघटनेत सर्व नागरिक समान हे तत्व स्विकारले गेले आहे. लिंगभेद, वंशभेद, धर्मभेद, भाषाभेद यांना मुठमाती देण्यात आलेली आहे. म्हणूनच महिलांना सामाजिक न्याय आणि हक्क मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न होतांना दिसत आहे.

ऑफीस ऑफ दी यूनायटेड नेशन्स हाय कमिशनर फॉर द हयूमन राइटस यांच्या मते, ‘महिला सशक्तीकरण म्हणजे स्त्रियांची शक्ती, दक्षता आणि कौशल्य वृध्दींगत करण्यासाठी तसेच स्वत:च्या जीवणमानाचा दर्जा उंचावून स्वयं निर्धारीत होण्यासाठी आवश्यक ते सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, पर्यावरण निर्माण करण्याची प्रक्रीया होय.”

भारतात गेल्या दशकात महिला सशक्तीकरणाची प्रक्रिया वेगाने पार पडली असली तरी भारतांच्या स्वातंत्र्यानंतर विविध शासकीय कार्यक्रम आणि योजनांमधून महिला सबलीकरणाचे प्रयत्न होत आहेत. 1980 च्या दशकात महिला कल्याण किंवा सशक्तीकरणाऐवजी “महिला विकास” या शब्दावर भर दिला जायचा. 1990 च्या दशकात स्त्री-पुरुष समानतेवर भर दिला गेला. आणि याच दशकाच्या शेवटीशेवटी महिला सशक्तीकरण हा शब्दप्रयोग करण्यात आला.

**शोध अध्ययनाचा उद्देश :**

- महिला सबलीकरणात शासकीय योजनांच्या भूमिकेचे मुल्यमापन करणे.
- अनेक समस्यांनी ग्रस्त असलेल्या महिलांच्या सामाजिक दर्जात सुधारणा होत आहे का यांचा आढावा घेणे.

- आधुनिक भारतातील पुरुषी मानसिकतेचे स्त्रियांकडे पाहण्याच्या बदलल्या दृष्टीकोणाचे अध्ययन करणे.

**शोध अध्ययनाची गृहितके** :

- महिला सबलिकरणाच्या प्रक्रीयेमूळे महिलांच्या सामाजिक दर्जात सुधारणा होत आहे.
- महिला सबलिकरणाच्या प्रक्रियेमूळे स्त्रियांना आपले मानवी हक्क आणि अधिकार यांची जाणीव होत आहे.
- स्त्रियांकडे पाहण्याचा पारंपारिक दृष्टीकोणातात महिला सबलिकरणामूळे बदल घडून येत आहे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत शोध अध्ययनासाठी दुय्यम स्त्रोतांचा वापर करुन तथ्य संकलित करण्यात आलेली आहेत अध्ययन विषंयांशी अनुषांगिक दुय्यम तथ्य संकलित करण्यासाठी विषयाशी संबंधीत संदर्भ ग्रंथ, निमशासकीय व शासकीय अहवाल, मासिके, साप्ताहिके, वृत्तपत्रे संशोधक पत्रिका, संकेत स्थळे, प्रकाशित – अप्रकाशित शोध अध्ययन इत्यादी माहितीचा आधार घेण्यात आला आहे.

**तथ्य विश्लेषण**

महिला सबलीकरण ही एक काळाची गजर बनली आहे. आज प्रयत्येक क्षेत्रात परिस्थितीनुसार अमुलाग्र बदल घडून येत आहेत. भारतात आज महिला सबलिकरणासाठी विविध कार्यक्रम व ध्येय धोरणे राबविले जात आहे.

स्त्रियांना पुरुषांइतका दर्जा प्राप्त व्हावा या दृष्टीने अनेक धोरणे भारतीय केंद्र सरकार आणि राज्यसरकार यांनी आखले. स्त्रियांची प्रगती, त्यांचा विकास आणि त्यांचे सक्षमीकरण हे घटक लक्षात घेवून नियोजन आखण्यात आले. महिला सक्षमीकरणाच्या सर्व प्रक्रियेत समाविष्ट असलेल्या सर्व भागीदारांचे सहभागीत्व कसे असेल याविषयी लक्ष देण्यात आले. महिला सशक्तीकरणामुळे स्त्रियांचे कार्यक्षेत्र फक्त ‘चूल आणि मूल’ यापूरतेच मर्यादीत न राहता ते शिक्षण, बँका, प्रशासन, राजकारण, अर्थकारण, समाजकारण यासारख्या सर्व क्षेत्राशी जोडले गेले आहे. महिला सशक्तीकरणामध्ये पुढील दहा घटकांवर भर दिला आहे.

- संसद आणि विधान मंडळामध्ये महिलांचा सहभाग.
- प्रशासन आणि व्यवस्थापनात महिलांचा समान सहभाग.
- व्यावसायिक आणि तांत्रीक सेवामध्ये महिलांचे योग्य प्रतिनिधीत्व.
- महिलांचे दरडोई उत्पन्न वाढवून त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविणे.
- महिलांचे शैक्षणिक स्थिती, आरोग्यविषयक स्थिती, पर्यटनाची सुविधा, स्वयंनिर्णयाचा अधिकार, सत्तेमध्ये स्त्री-पुरुषंना समान अधिकार.
- बालिका शिक्षणास विशेष प्राधान्य, भ्रूण हत्येस प्रतिबंध.
- महिलांना संपत्तीत वाटा. (सासरी आणि माहेरी)
- नोकऱ्यांमध्ये आरक्षण, हुंड्यामुळे होणाऱ्या हत्यांना प्रतिबंध, मुलगा नाही म्हणून किंवा वांझ आहे म्हणून होणाऱ्या अपमानाविरूध्द संरक्षण.
- बालश्रमासारखेच महिला श्रमाचे मानधन ठरविणे.
- महिलांना कुटूंबाकल्याणासाठी उपयुक्त आणि पर्याप्त सुविधा उपलब्ध करणे. त्यांना मोफत शिक्षण देणे. तसेच नवनवीन क्षेत्रांमध्ये महिलांच्यासाठी योग्य प्रकारच्या संधी आणि सुविधा निर्माण करणे.

भारत सरकारने २००१ हे वर्ष महिला सशक्तिकरण वर्ष म्हणून साजरे केले. या धोरणाचे उद्दिष्ट महिलांची प्रगती, विकास आणि त्यांचे सशक्तीकरण घडविणे हे होते. तसेच २०१० मध्ये महिला सबलीकरण राष्ट्रीय मिशन धोरण ठरविण्यात आले. या धोरणात शासनाच्या भूमिकांना निर्धारित करून भविष्यातील धोरणांशी त्यांना संलग्न करणे आणि महिला सशक्तीकरण कार्यक्रमांना सत्यात उतरवणे हे होते. या मिशनच्या प्रत्यक्ष कार्याला २०११-१२ पासून सुरुवात झाली.

महिलांची सामाजिक, आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी आणि त्यांना अधिक कुशल आणि सक्षम बनविण्यासाठी भारत सरकारची कृषी व किसान कल्याण मंत्रालय आणि ग्रामीण विकास मंत्रालय यांची महत्वाची भूमिका आहे. ग्रामीण विकास मंत्रालयाने किसान महिलांची स्थिती सुधारण्यासाठी ꣳमहिला सशक्तिकरण परियोजना सुरुवात केली आहे. जिचा उद्देश किसान महिलांचे तांत्रिक सशक्तिरकणाद्वारे आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविणे हा आहे.

ग्रामीण विकासाची संकल्पना ही बृहत आणि सर्वसमावेशक करण्यासाठी ७३ वी घटनादुरुस्ती करून महिलांसाठी ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद या स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये राखीव जागा सोडण्यात आल्या. त्यामूळे तळागळातील सामाजिक महिला नेतृत्व पुढे आले. गावाच्या विकासात महिला सहभाग घेवू लागल्या. स्त्रियांच्या सहभागावरून हेच दिसून येते की, त्यांना मिळालेल्या संधीचा फायदा घेण्यासाठी त्या तयार आहेत. ग्रामीण महिला सबलीकरणामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थातील आरक्षण एक मैलाचा दगड ठरला आहे.

स्वयंसहाय्यता महिला बचत गटाने ग्रामीण महिलांना आर्थिक स्वावलंबत्व आणि स्वातंत्र्यप्राप्त करून दिले आहे. बचत गट नव्वद टक्के महिला चालवतात. ग्रामीण भागातील वाडीवस्त्या, गल्ली, जंगली भाग, डोंगरद-या आदी सर्वच भागात बचतगट निर्माण झालेले आहेत. जीवनातील नव-नव्या आव्हानांना व जबाबदाऱ्या पेलण्यासाठी महिलांची क्षमता विकसीत करणारा महिला बचत गट होय. ह्या बचतगटाद्वारे महिलाकडून छोटे-मोटे उद्योग चालवले जावू लागले आहे. तसेच बचत गटाच्या माध्यमातून महिलांमध्ये अचूक निर्णयक्षमता, कार्यक्षमता, व्यवसाय व्यवस्थापन कौशल्य आणि उत्पन्नातील निश्चितता आणि संधी लक्षात येण्यास मदत होत आहे. या सामूहिक शक्तीच्या रुपाने ग्रामीण महिलांचे आर्थिक सबलीकरण होत आहे.

वरील महिला सबलीकरणाच्या योजनाबरोबरच महिलांच्या सामाजिक व आर्थिक सशक्तीकरणाच्या विविध योजना सहाव्या पंचवार्षिक योजनेपासून लागू करण्यात आलेल्या आहेत. स्वावलंबन कार्यक्रम (१९८२), महिला सामाख्य योजना (१९८९), माता बाल आरोग्य कार्यक्रम (१९९२), राष्ट्रीय महिलांच्या मुख्य कर्ज योजना (१९९३), राष्ट्रीय मातृत्व लाभ योजना (१९९४), ग्रामीण महिला विकास योजना (१९९६) ग्रामीण महिला आणि बालविकास कार्यक्रम (१९९०), किशोरी शक्ती योजना (२०००-०१), महिला स्वयंसिध्द योजना (२००१-०२), महिला उद्योजकासाठी कर्ज योजना (२००१-०२), जीवन भारती महिला सुरक्षा योजना (२००२-०३), कस्तुरबा गांधी विशेष बालिका योजना (२००३-०४), जननी सुरक्षा योजना (२००३-०४), आशा योजना (२००४-०५), एकुलती एक कन्या शिष्यवृत्ती योजना (२००६-०७), तसेच महिलांच्यासाठी कायदेशीर संरक्षण करण्याच्या हेतूने अनेक कायदे करण्यात आले. संविधानाचे कलम १४, १५, १७, १९, २३ आणि ३९ मध्ये प्रदेश, जाती, धर्म, लिंग, जन्मस्थान यांच्या आधारावर भेदभाव न करता सर्वांना समान संधी आणि समानता उपलब्ध करण्याची हमी देते. तसेच विवाह कायदा दुरुस्ती अधिनियम (२००१), भारतीय घटस्फोट दुरुस्ती अधिनियम (२००१), वारसा दुरुस्ती अधिनियम (२००२), हिंदू विवाह अधिनियम व विशेष विवाह अधिनियम (२००३), सीआरपीसी दुरुस्ती अधिनियम (२००१), हिंदू वारसा दुरुस्ती अधिनियम (२००५), घरगुती हिंसाचारापासून संरक्षण (२००५), बालिका शक्तीचे शिक्षण व कल्याण अधिनियम (२००१), विवाह नोंदणी अनिवार्य अधिनियम विधेयक (२००५), इत्यादी कायद्याद्वारे महिलांच्या हक्कांचे संरक्षण करण्यात आलेले आहे.

वरील सर्व कल्याणकारी उपाययोजनामुळे ग्रामीण महिलांचे सशक्तीकरण होत आहे. आधुनिक काळातील बदलत्या परिस्थितीनुसार महिलांची क्षमता आणि योग्यता यात उत्तरोत्तर प्रगती होत आहे. त्यांना त्यांच्या क्षमता संबंधी आत्मविश्वास विकसीत आहे. असे जरी असले तरी महिलांचे सबलीकरण आणि राजकीय सत्तेत पन्नास टक्के वाटा देण्याची चर्चा असतानाच महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. महिलांसाठी धोकादायक देशामध्ये भारताचा चौथा क्रमांक आहे. अफगानिस्तान व कांगोपेक्षा भारतात महिला किंचित सुरक्षित असल्या तरी समुद्री लुटारूसाठी कुप्रसिध्द असलेल्या सोमालियापेक्षा भारतातील महिलांच्या अब्रूला धोका आहे. भारतातील महिला अत्याचाराचा सर्वदूर पसरत चाललेला व्हायरस रोखण्यात शासनव्यवस्थेला आणि समाजव्यवस्थेला अपयश येत आहे. यावरून हे स्पष्ट होते की, भारतीय समाजातील पुरुषी मानसिकता अजूनही म्हणावी तशी बदललेली नाही.

**निष्कर्ष :**

भारतीय समाजातील स्त्रियांकडे बघण्याच्या पारंपारिक दृष्टीकोनात निश्चित बदल होत आहे. महिला

सबलिकरणाच्या प्रक्रियेमुळे स्त्रियांचे सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक दर्जात सुधारणा झालेली आहे. ग्रामीण महिला स्वतःच्या हक्काबाबत, कर्तव्य आणि संधी बाबत जागरुक होत आहेत. सामाजिक, आर्थिक आणि कायदेशीर उपाययोजनामुळे स्वतंत्र ग्रामीण भारतातील स्त्री समाजात काही प्रमाणात चांगला दर्जा मिळविण्यात यशस्वी होत आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर स्त्रिया हळू हळू आत्तापर्यंत चालत आलेल्या बंदिस्त करणाऱ्या गुंतागुंतिच्या आणि दुष्प्रथांतून जाणवण्याइतक्या प्रमाणात मुक्तता मिळविण्यात यशस्वी ठरल्या आहेत. आजच्या ग्रामीण स्त्रियांनी सामाजिक, आर्थिक, आणि राजकीय क्षेत्रात आपले कर्तृत्व दाखविले आहे. असे असले तरी ग्रामीण महिलांसमोर खूप काही आव्हाने आहेत. देशातील महिला आज जरी पुरुषांच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर असल्या व त्यांचे सक्षमीकरण होत असले तरी स्त्रियांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळे स्त्री सशक्तीकरण झाले असे म्हणता येणार नाही. त्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाने महिला सबलीकरणामध्ये येणाऱ्या अडथळ्यांना खंबीरपणे मोडून काढले पाहिजे आणि भारतीय समाजातील पुरुषी मानसिकतेतही अमुलाग्र बदल झाला पाहिजे तेव्हा खऱ्या अर्थाने महिलांचे सबलीकरण घडून येईल.

**संदर्भ सूची:**


- स्टडी सर्कल रिसर्च फौंडेशन, मनुष्यबळ, मानवी हक्क व समुदाय विकास, स्टडी सर्कल पब्लिकेशन्स, मुंबई.
- कुलकर्णी पी.के., २०१३, मानवी हक्क आणि सामाजिक न्याय, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.
- कुलकर्णी पि.के., २०१३, मानवी हक्क आणि सामाजिक न्याय, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.
- संपा., दीपिका कच्छल, ग्रामीण महिलाओं का सशक्तिकरण, कुरुक्षेत्र मासिक अंक-जनवरी, २०१८, सुचना आणि प्रसारण मंत्रालय, भारत सरकार.
- दैनिक पुण्यनगरी (वृत्तपत्र), २५ डिसेंबर २०१२.